**<u>वादी तर्फे साक्षीदार क्र. १</u>** **<u>नि.दि.दा.क्र.९९/२०२२</u>**
**शरद विरुध्द क्रिष्णा**
**मी शपथपूर्वक खरे सांगतो की** **निशाणी – १७**

**उलटतपास प्रतिवादी तर्फे वकील श्री. ए.डी. बागडे यांच्यातर्फे निशाणी ३६ वरील आदेशानूसार सुरू**

२१. मी हातमजूरीचे काम करतो. हे म्हणणे खरे आहे की दाव्याच्या मथळयात मी व्यवसाय करत असल्याचे नमूद केले आहे ते चूकीचे आहे. हे म्हणणे खरे आहे की शपथपत्रामध्ये मी शेती करत असल्याचे चुकीचे नमूद केले आहे. माझे कोराडी येथे स्वत:चे घर आहे. मी लहानपणापासून म्हणजे कोराडीचे पुर्णवसन झाले तेव्हापासून मी तेथे राहतो. मी रोज ४५० रू. पगाराने काम करतो. मी मजूरी करत असल्याचा कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केला नाही. हे म्हणणे खरे नाही की मी मजूरी करत नाही. हे म्हणणे खरे नाही की माझी दिवसाची ४५०/– रू. कमाई असल्याचे मी खोटे सांगतो. मी आयकर भरत नाही. माझ्याकडे पॅन कार्ड आहे.

२२. मी प्रतिवादीलो ओळखत नाही. प्रतिवादी कोराडी भागात लहानपणापासून राहतात का याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की मी प्रतिवादीला चांगल्या रितीने ओळखतो. प्रतिवादीने झोपडे बांधल्याने मी त्याच्याविरूध्द दावा दाखल केला.

**प्रतिवादीच्या वकीलांनी निशाणी ३७ कडे उलटतपास पुढील तारखेपर्यत तहकूब करण्याची विंनतीचा अर्ज दिल्याने त्या अर्जावरील आदेशानूसार उलटतपास पुढील तारखेपर्यत तहकूब**

श्रवणोत्तर स्वीकृत
समक्ष

MOHAN RAMCHANDRA KAMAT
Digitally signed by MOHAN RAMCHANDRA KAMAT
Date: 2025.11.27 16:56:33 +0530

कामठी
दिनांक २७/११/२०२५

( एम.आर. कामत )
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, कामठी